# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४

ईमेल: kvk_ndb@yahoo.com

### ८७) जिल्हा : नंदुरबार हवामान आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २७ जानेवारी, २०२६

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२८/०१/२०२६ ते ०१/०२/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २८ | २९ | ३० | ३१ | ०१ |
| पाऊस(मिमी) | १ | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान(अं.से.) | २७ | २८ | ३० | ३१ | ३० |
| किमानतापमान (अं.से.) | १३ | १२ | १४ | १५ | १६ |
| ढग स्थिती (आकाश) | अंशतः ढगाळ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | अंशतः ढगाळ |
| स. सापेक्ष आर्द्रता (%) | ८७ | ८३ | ८० | ८१ | ८१ |
| दु.सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ६५ | ७१ | ७४ | ७४ |
| हवेचा वेग (किमी/तास) | ७ | ५ | ११ | १२ | ४ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषी विषयक सल्ला |
|---|---|---|
| पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज सारांश | | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार जिल्ह्यात पुढील पाच दिवस हवामान अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान २७ ते ३१ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १२ ते १६ अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे. |
| पुढील आठवड्याचा विस्तारित श्रेणी हवामान अंदाज | | दि. ०१ ते ७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान मध्य महाराष्ट्रात कमाल तापमान सरासरी ऐवढे व किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | हवामानाचा अंदाज व पीकनिहाय कृषीहवामान सल्ला पाहण्यासाठी “मेघदुत” ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | रब्बी पिकांना पिकांच्या वाढीच्या संवेदनशील अवस्थेत पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| गहु | शाखीय वाढीची | कमी तापमानामुळे पिकास पेरणीनंतर ४० ते ४२ दिवसांनी दुसरे पाणी देण्याची व्यवस्था करावी. बागायत वेळेवर पेरणी – पेरणीनंतर तीन आठवड्यांनी २४ किलो नत्र प्रति एकरी द्यावे. बागायत उशिरा पेरणी - पेरणीनंतर तीन आठवड्यांनी १६ किलो नत्र प्रति एकरी द्यावे. |
| ज्वारी | वाढीची अवस्था | रबी ज्वारीमध्ये कमी तापमानामुळे मावा या किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास सुरुवातीस निम अर्क ५% याची फवारणी करावी. प्रादुर्भाव जास्त झाल्यास डायमिथोएट ३० ईसी १.५ मिली किंवा थायमिथोक्झाम २५ WG ०.३ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात घेऊन फवारणी करावी. |
| हरभरा | शाखीय वाढीची अवस्था | ढगाळ हवामानामुळे घाटेअळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव समजण्यासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावीत. यामध्ये मोठ्या प्रमाणावर पतंग अडकले जाऊन प्रजननास आळा बसतो. पिकात पक्ष्यांना बसण्यासाठी दर १५-२० मिटर अंतरावर पक्षी थांबे लावावेत. नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क फवारणी करावी. |
| उन्हाळी भुईमुग | पेरणी | उन्हाळी भुईमुग पिकाची पेरणी १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करता येते. सध्याच्या कमी तापमानामुळे उगवण क्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता असल्याने पेरणी किमान तापमान १८ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त झाल्यास करावी. पेरणीसाठी वाणनिहाय बियाणे प्रति हेक्टरी खालीलप्रमाणे वापरावे.<br>१०० किलो : एसबी-११, टीएजी-२४, टीजी-२६, जेएल-५०१, फुले-६०२१ ई.<br>१२० ते १२५ किलोः फुले प्रगती, फुले व्यास, टीपीजी-४१. फुले उनप, फुले उन्नती, फुले भारती ई. |
| ऊस | लागवड | सुरु ऊस लागवड १५ फेब्रुवारीपर्यंत करावी. बेणे प्रक्रिया : १०० लिटर पाण्यात ३०० मि.लि. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४

ईमेल: kvk_ndb@yahoo.com

| | | |
|---|---|---|
| | | मॅलॅथिऑन (५० इसी) आणि १०० ग्रॅम कार्बेन्डाझिम चांगले मिसळावे. त्यामध्ये टिपऱ्या १० मिनिटे बुडवाव्यात. त्यानंतर स्वतंत्रपणे १०० लिटर पाण्यात ॲसेटोबॅक्टर जिवाणू संवर्धक एकरी ४ किलो आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणू संवर्धक ५०० ग्रॅम मिसळून या द्रावणात टिपऱ्या ३० मिनिटे बुडवाव्यात. त्यानंतर लगेच लागवड करावी. |
| टरबूज व खरबूज | लागवडीची तयारी | लागवडीचा हंगाम: या पिकाची लागवड प्रामुख्याने जानेवारी ते फेब्रुवारीमध्ये करावी. लागवडीसाठी खालील जातींची निवड करावी. कलिंगड जाती : शुगर बेबी, अर्का माणिक, अर्का ज्योती ई.<br>खरबूज जाती : पुसा सरबती, दुर्गापुरा मधू, हरा मधू, अर्का राजहंस, अर्का ज्योत, ई. |
| पपई | फळ वाढीची | थंडीपासून संरक्षणासाठी फळास पांढ-या प्लास्टिक बॅगचे आवरण लावावे. फळबागेत सेंद्रिय आच्छादनाचा वापर केल्यास मुळांच्या कक्षेत उष्णता टिकून राहण्यास मदत होते. फळबागेत शक्यतो सकाळी पाणी द्यावे. ज्यामुळे जमिनीचे तापमान वाढून योग्य सूक्ष्म वातावरण निर्माण होऊन पिकावर होणारा थंडीचा परिणाम कमी होईल. |
| केळी | फळ वाढीची | थंडीपासून संरक्षणासाठी फळास पांढ-या प्लास्टिक बॅगचे आवरण लावावे. फळबागेत सेंद्रिय आच्छादनाचा वापर केल्यास मुळांच्या कक्षेत उष्णता टिकून राहण्यास मदत होते. फळबागेत शक्यतो सकाळी पाणी द्यावे. ज्यामुळे जमिनीचे तापमान वाढून योग्य सूक्ष्म वातावरण निर्माण होऊन पिकावर होणारा थंडीचा परिणाम कमी होईल. |
| पशुसंवर्धन | - | उर्जा व प्रथिनेयुक्त पशु आहाराचा समावेश करून पशुचा आहार वाढवावा. श्वसनाचे आजार संभावण्याची शक्यता असते त्यामुळे विशेषतः लहान वासरांची काळजी घ्यावी. |
| कुक्कुटपालन | - | थंड वातावरणात कोंबड्या जास्त प्रमाणात बळी पडतात. शेडमध्ये तापमान वाढवण्यासाठी बल्ब लावावेत आणि शेडला पडदे लावावे. पक्षांना उर्जा व प्रथिनेयुक्त आहाराचा समावेश करून आहार वाढवावा. |

**स्त्रोत**

१) हवामान पूर्वानुमान : भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार
दि. : २७/०१/२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक,
ग्रामीण कृषि मौसम सेवा - जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार